‘बनारस शहरावरचा दुर्मिळ दस्तावेज’

‘ए हँडबुक ऑफ बनारस’ लेखक : रेव्ह. आर्थर पार्कर हयांचं १९०१ साली त्रावणकोर (त्रिबांद्रम) प्रेसनं प्रकाशित केलेलं दुर्मिळ पुस्तक आता ‘गुगल.बुक्स.कॉम’ हया वेब साईट वर उपलब्ध असून अश्या प्रकारच्या जुन्या व अति दुर्मिळ पुस्तकांचा खजिनाच ग्रंथप्रेमींकरता खुला होतो आहे. हया उपक्रमाची माहिती प्रत्येक पुस्तकाच्या सुरूवातीस दिलेली आहे. जगभरातल्या ग्रंथालयांच्या सहकार्यानं हा प्रकल्प राबविला जात असून प्रस्तुत पुस्तक स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीच्या ग्रंथालयातून घेतलेलं आहे. एकूण एकशे अकरा पानांचं हे पुस्तक काळजीपूर्वक स्कॅन करून पी.डी.एफ.फाईल च्या स्वरूपात कॉम्प्युटरवर वाचता येतं. अश्या प्रकारच्या अनोख्या पुस्तकांचा पण परिचय ‘ग्रंथ-विश्व’ सदरातून करून देणं आधुनिक काळाला अनुसरून ठरावं.

ही दुसरी आवृत्ती असून तिच्या प्रस्तावनेत आर्थर पार्कर लिहितात ‘बनारस शहराचा हे पुस्तक म्हणजे एक छोटा वाटाडया आहे. हिंदूंची श्रद्धास्थानं असलेली मंदिरं व गंगा नदीकाठचा घाट ही हया शहराची खूण आहे. दिल्ली आग्रा व लखनौ इथल्या मुघलकालीन शिल्पांचा ठसा मनात घेऊन येणा-यांचा इथं भ्रमनिरास होणार यात शंकाच नाही. इथले रस्ते व परिसराची ओळख सोबतच्या नकाशातून होई लच. तरीही एखादा गाईड वा प्रवासी मार्गदर्शक अधिक उपयोगाचा ठरेल. हया शहराची भेट वा यात्रा आटोपल्यावर जुन्या आठवणींना ऊजाळा देण्यासाठी हे पुस्तक अधिक कामाला येईल.’

पुस्तक बनारस वर पण प्रस्तावना लेखन व छपाई मात्र त्रिवेंद्रम इथून केलेली आहे. कदाचित अनेक वर्षे बनारसमध्ये राहिलेल्या लेखकाची बदली दक्षिणेकडे झाली असावी. तिथं लिखाण व छपाई झाली असावी.

एकूण पाच प्रकरणांत हया पुस्तिकेची रचना केली असून त्यात शहराची ओळख, इतिहास, १९०० मधलं शहर, प्रेक्षणीय स्थळांची अकारविल्हे (अल्फाबेटिकल) यादी व प्रवाशांसाठी मौलिक सूचना दिल्या आहेत. शहराचा नकाशा व सार्वजनिक वाहतूकीच्या साधनांची दरपत्रकांसहित माहिती दिलेली आहे.

ही पुस्तिका खास करून परदेशी व परप्रांतातून येणारे प्रवासी व यात्रेकरूंसाठी लिहिली आहे. त्यांच्या करिता खास सूचना व सावधानतेचे इशारे दिलेले आहेत. रेलवेने शहरात येताना पुलावरून गंगा नदीचं विशाल पात्र पहात असतानाच डब्यात शिरलेल्या भुरटया व संभावित चोरांपासून व दलालांपासून सावध रहावयाचा व सामानाचं रक्षण करायचा इशारा दिलेला आहे. तीन दिवसात महत्वाची स्थळं बघण्याचा आराखडा देताना बोटीतून प्रवास करत चांदण्या रात्री घाटांचं दर्शन कसं घ्यावं हे सांगितलं आहे. मंदिराच्या भोवती घुटमळणारे, गळयात पडणारे व लुटणारे पंडे कसे ओळखावेत हे वाचलं की आज एकशे दहा वर्षांनी परिस्थिती तशीच असल्याचं जाणवतं. परदेशी पाहुण्यांनी अकारण कशालाही स्पर्श करू नये, सदा सावधचित्त असावे व जोडे घालून मंदिराच्या परिसरात मुळीच भटकू नये या विषयीच्या तपशीलवार सूचना आहेत.

१८८0 ते १८८७ हया सात वर्षांत गंगेवरील रेलवेचा पूल बांधला.त्याची लांबी ३५६८ फूट असून ७५ लाख रूपये खर्चण्यात आले.लॉर्ड डकरिनच्या हस्ते त्याचं उदघाटन झालं व त्याचं नाव पुलाला देण्यात आलं.गाडी पुलावरून जात येत असताना विस्तीर्ण घाट व त्यामागच्या मंदिरांची गोपुरं दिसायला लागतात.बनारस इलाख्यात बनारस शहर, जौनपूर, मिर्झापूर, गाझीपूर व बालिया हे विभाग असून लोकसंख्या पन्नास लाखाहून अधिक असल्याची माहिती मिळते.शहरातल्या कँटोनमेंट भागातल्या 'हॉटेल द पॅरिस' व 'क्लार्क हॉटेल'ची खास शिफारस असून आगावू आरक्षण हिताचे ठरेल असा सल्लाही आहे.अलिकडेच उभारलेल्या जलशुद्धिकरण केंद्रामुळं बनारसकर खूष असल्याचा उल्लेख आढळतो.मैल्या गंगेचा प्रश्ण इतका प्राचीन आहे.बनारसचा बाजार, जरीकाम केलेले शालू, नक्षीकाम केलेली तांब्यापितळेची भांडी, घाटांवरची गंगास्नानं व विश्वेश्वराचं मंदिर व परिसराची रम्य वर्णनं आहेत.

हया हँडबुकचं वैशिष्टय हे की बनारस शहराचा इतिहास व १९00 मधली प्रेक्षणीय स्थळं हयांची फार छान सांगड हयात घातली आहे.तीसेक पानांत प्राचीन काळ, बुद्ध काळ, मुघल कालखंड, मराठा काळ व आधुनिक ब्रिटिश कालखंडात काशी ते वाराणसी व वाराणसी ते बनारस हा राजकीय, सामाजिक व धार्मिक प्रवास मांडला आहे.तो कसा होत गेला तो मुळातूनच वाचावा असा आहे.मुहंमद घोरी व इतर मुघल आक्रमणांच्या मालिकेत एकदा तर हया शहराचं 'काशी' हे नाव बदलून 'मुहम्मदाबाद' केलं गेलं होतं.पण काळाच्या

ओघात ते टिकलं मात्र नाही. हया सर्वांना पुरून काशीचे ब्राम्हण व त्यांची धार्मिक सत्ता कशी टिकून राहिली हे फार छान मांडलं आहे. बुद्ध धर्मियांना सुद्धा त्यांनी निष्प्रभ केलं व हया नगरावरचा आपला ठसा गडद केला. त्याचा प्रभाव अजूनही कायम आहे. त्याच सुमारास युरोपातल्या अनेक ठळक घडामोडी व घटना यांचा उल्लेख व त्यांवरील भाष्य लेखकाचा सखोल अभ्यास व विषय नेमकेपणं मांडण्यातली हातोटी दाखवितो.

अशी पार्श्वभूमी तयार झाल्यावर मग १९0१ च्या आसपासचं शहर व पर्यटनस्थळांना भेटी देताना प्रवाशांना एक वेगळाच अनुभव येत असला पाहिजे. गंगा नदीकाठावरचे सदैव गजबजलेले अनेक घाट व भाविकांनी ओसंडून जाणारी शेकडो मंदिरं हीच शहराची खूण असून दाटीवाटी झाल्यानं नवीन बांधकामांना जागाच उरलेली नाही असं निरिक्षण लेखक नोंदवतो. आज ११0 वर्षांनी यात फारसा फरक पडलेला नाही. वाटाडया किंवा स्थानिक रहिवासी बरोबर नसेल तर मंदिराभोवतालच्या भूलभुलैय्यात कुणीही प्रवासी व यात्रेकरू सहज अडकू शकतो. हीच परिस्थिती अगदी आज पण तशीच आहे.

प्रेक्षणीय स्थळांच्या यादीत अन्नपूर्णा मंदिराचा उल्लेख असून हे मंदिर पुणे शहराच्या राजानं बांधलं असल्याचं म्हटलं आहे. इथल्या मशिदींमध्ये बुद्धकालीन व हिंदू मंदिराच्या बांधकामांचे अवशेष आढळतात असं निरिक्षण लेखकानं नोंदवलं आहे. अशी एक मशिद तर रेलवे स्थानकालगतच आहे. १८२५ मध्ये पुण्याच्या बाजीराव पेशव्यांनी बांधलेल्या भैरवनाथाच्या मंदिर परिसराचं वर्णन केलेलं

आहे. दशाश्वमेध घाटापासून सुरूवात करून अनेक घाटांची वर्णनं केलेली आहेत. ज्या घाटावर प्रेतं जाळली जातात त्या ‘बर्निंग घाटा’वरील विधी वाचताना आपण आजच्या काळातच असल्याचं जाणवतं. काशी विश्वेश्वराच्या मंदिराची माहिती देताना लेखकानं जहांगीर बादशहाच्या आत्मचरित्राचा पण आधार घेतलेला आहे. त्यातली माहिती मुळातूनच वाचावी.

घाट, मंदिरे, मशिदी व लोकजीवनाचं वर्णन करताना इथल्या मिशनरी सोसायटयांच्या कामांची व चर्चेसची माहिती पण दिलेली आहे. १८१८ मध्ये पहिली बाप्टिस्ट मिशनरी सोसायटी स्थापन झाली व शतक संपेतो आणखी पाचेक सोसायटया उभ्या राहिल्या. राजा मानसिंगाचा मंदिर उभारण्याच्या कामांतला सहभाग व जयपूरच्या राजा जयसिंगानं उभारलेली ऑब्झरवेटरी व यंत्रं यांचाही उल्लेख स्थलवर्णनांच्या ओघात वाचावयास मिळतो. तेरा हजार ब्रिटिश पौंड खर्चून बांधलेल्या क्वीन्स कॉलेजची माहिती दिली असून सातशे विद्यार्थी शिकत असल्याचं नमूद केलेलं आहे. शहरापासून तीन मैलावरील ‘सारनाथ’ हया पर्यटन स्थळाची माहिती तीन पानं भरून दिली असून भगवान गौतम बुद्धाच्या काळापासून ते आता उरलेल्या अवशेषांची अवस्था व अनास्था मांडली आहे. पुस्तकाच्या मुखपृष्ठावर ‘नकाशा’सहित असा उल्लेख आहे. मात्र नेटवरील पानांमध्ये मात्र नकाशा वा छायाचित्रं किंवा रेखाचित्रं पण आढळत नाहीत.

गेल्या शंभराहून अधिक वर्षांमध्ये गंगेतून बरंच पाणी वाहून गेलंय. घाण पण इतकी ओतली गेली आहे की गंगाजल शुद्धीकरणाचे

प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. शहराचा विस्तारही अफाट वाढला आहे. १९१४ व १९१६ साली अनुक्रमे काशी विद्यापीठ व बनारस विश्व विद्यालयाची स्थापना झाली असून दोन्ही आजमितीला विद्यादानाचं काम उत्तम रीतीनं पार पाडत आहेत. बनारसी पान, बनारसी शालू व बनारसी ठुमरीशी पण शहराचं नाव जोडलं गेलेलं आहे. उद्योग व व्यापार उदीम पण भरभराटीला आलेला आहे. अश्या वेळी इतक्या जुन्या हँडबुकाचं महत्व ते काय असा प्रश्ण कुणालाही पडणं साहजिकच आहे. त्याचं उत्तर मिळविण्यासाठी तरी हे पुस्तक वाचणं जरूरीचं आहे. मुख्य म्हणजे इंटरनेटवर ते अगदी विनामूल्य उपलब्ध आहे.

‘ए हँडबुक ऑफ बनारस’ ः रेव्ह. आर्थर पार्कर (लंडन मिशनरी सोसायटी), १९०१.

डॉ. सुरेश चांदवणकर, २३ जानेवारी २०११
chandvankar.suresh@gmail.com

A HAND-BOOK OF BENARES,

BY THE

REV. ARTHUR PARKER,
LONDON MISSIONARY SOCIETY.

WITH A MAP OF THE CITY.

Second and Revised Edition.

Trivandrum;
PRINTED AT THE TRAVANCORE GOVERNMENT PRESS,

1901.